**भाग 'अ'** **निशानी –१० पुढे**

MHGA030011172022

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गडचिरोली यांचे न्यायालयात**
**(पिठासिन अधिकारी चं. प्र. रघुवंशी)**

न्यायनिर्णयाची तारीख :-
२४.०१.२०२४

सं. फौ. मा. क्र.
७२९/२०२२
गुन्हा क्र.८५१/२०२१

आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा ६५(ई) अन्वये पोलीस स्टेशन, गडचिरोली येथे प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस स्टेशन, गडचिरोली, |
| अभियोजन पक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एम. ए. वटी |
| आरोपी | | किशोर सुखराम सहारे<br>वय ४० वर्षे, धंदा – मजुरी,<br>रा. गोकुळनगर वार्ड क्र.२३,<br>गडचिरोली, तह.जि. गडचिरोली. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | ॲड. श्री एन.एस.उंदिरवाडे |

## भाग 'ब'

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १७.१०.२०२१ |
| एफ.आय.आर.ची तारीख | १७.१०.२०२१ |
| आरोपपत्राची तारीख | ०४.१०.२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | २०.०७.२०२३ |
| पुरावा सुरू होण्याची तारीख | २४.०८.२०२३ |
| निकाल राखून ठेवला आहे ती तारीख | १५.०१.२०२४ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २४.०१.२०२४ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल | —निरंक— |

## आरोपी तपशिल

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटण्याची तारीख | दोषारोप ठेवण्यात आलेला गुन्हा | निर्दोष सुटले की नाही | शिक्षा ठोठावली | कलम ४२८ फौ.प्र. सं. अन्वये खटल्यामध्ये अटकेत राहिल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | किशोर सुखराम सहारे | अटक नाही | २०.०७.२०२३ | महाराष्ट्र दारुबंदी कायदा ६५(ई) अन्वये | निर्दोष | नाही. | लागू होत नाही. |

## भाग 'क'

अभियोजन पक्ष, आरोपी व न्यायालयीन साक्षीदारांची यादी

अ. अभियोजन पक्ष

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| १ | आकाश नागेश भैसारे | पंच साक्षीदार |
| २ | नितीन सुरेश पांडे | पंच साक्षीदार |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, जर असेल:

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. न्यायालयीन साक्षीदार, जर असेल:

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

सरकारी पक्ष/बचाव पक्ष/ न्यायालयीन निशानीची यादी

अ. सरकारी पक्ष

| अ.क्र | निशानी कं. | विवरण |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ब. बचाव पक्ष

| अ.क्र | निशानी कं. | विवरण |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. न्यायालयीन निशानी

| अ.क्र | निशानी कं. | विवरण |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ड. भौतिक वस्तू

| अ.क्र | वस्तूचे कं | विवरण |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य

(दिनांक २४/०१/२०२४ रोजी घोषित)

आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये खटला चालविण्यात आला.

२.        सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांचा तर आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरण संक्षिप्त असल्याने खालील प्रश्ने माझे विचारार्थ निर्माण झाले व त्यासंबंधी निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे.

| **प्रश्ने** | **निष्कर्ष** |
| --- | --- |
| १. दिनांक १७/१०/२०२१ रोजी संध्याकाळी ०५:३० ते ०६. १० वाजताच्या दरम्यान मौजा गोकुळनगर वार्ड क्र.२३, गडचिरोली, तह. जि. गडचिरोली येथे आरोपीच्या घराच्या झडतीत एका कापडी थैलीमध्ये रॉयल स्टॅग कंपनीच्या ३७५ एम एल मापाच्या विदेशी दारू एकूण ०२ निपा व प्रत्येकी ५०० मिली मापाचे हायवर्ड ५००० कंपनीच्या विदेशी बिअरचे टिनाचे ५ सिलबंद नग अवैद्यरित्या वाहतुक करित असतांना मिळून आले आणि त्याद्वारे आरोपींनी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने सिध्द् केले आहे काय ? | **...नाही.** |
| २ आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

३.        आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने पंच साक्षीदार क्र.१ आकाश नागेश भैसारे व सा.क्र.२ नितीन सुरेश पांडे यांना तपासले. पुरेशी संधी देवूनही अभियोग पक्षाला इतर साक्षदार हजर करता आले नाही. तसेच कोणताही कागदोपत्री पुरावा सिध्द केला नाही. अभियोग पक्षाची पुराव्याची बाजु नि.क्र.१ वरिल आदेशाद्वारे बंद करण्यात आली. आरोपीचे निवेदन कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहितेद्वारे नोंदविण्यात आले. त्याचा बचाव नकारात्मक आहे.

### <u>प्रश्ने क्र.१ व २ बाबत</u> :

४.        अभियोग पक्षाचे पंच साक्षीदार क्र.१ आकाश नागेश भैसारे व सा.क्र. २ नितीन सुरेश पांडे यांनी पुराव्यात सांगितले की, पोलिसांनी त्यांच्यासमक्ष पंचनामा तयार केला नाही व त्यांच्या समक्ष काही जप्त केले नाही. घटनास्थळ पंचनामा व जप्तीपत्रकावर त्यांची सही असल्याचे मान्य केले. सदर साक्षदाराने पंचनाम्यातील मजकूराबाबत पूर्णपणे अनभिज्ञता दर्शविली. अभियोग पक्षाला पुरक

अशी कोणतीही बाब अभिलेखावर आली नाही. या प्रकरणात अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषण अहवाल सिध्द केला नाही व इतर महत्वाचे साक्षीदार सुध्दा तपासले नाही. त्याच प्रमाणे अभिलेखावरिल महत्वाचे दस्ताऐवज घटनास्थळ पंचनामा, सि.ए.फार्म सुध्दा सिध्द किंवा शाबीत केले नाही.

५. सदर प्रकरणात उपरोक्त साक्षदाराशिवाय सरकार पक्षातर्फे तपासी अधिकारी व इतर साक्षदारांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. सदर प्रकरणात सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या उपरोक्त नमुद साक्षदाराने पोलीसांनी त्यांच्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन मुददेमाल जप्त केले नसल्याचे कथन केले आहे. अशा परिस्थीतीत पंचनामा सिध्द करण्यासाठी सरकार पक्षाला तपासी अधिका—यांची साक्ष नोंदविणे आवश्यक होते. परंतु सरकार पक्ष सदर प्रकरणात तपासी अधिका—यांची साक्ष नोंदविण्यास अपयशी ठरलेले आहे. सबब सरकार पक्ष सदर प्रकरणातील पंचनामा भारतीय पुराव्यात कायदयाच्या तरतुदीप्रमाणे सिध्द करण्यास सपशेल अपयशी ठरलेला आहे. त्यामुळे जप्त मुददेमाल दारु होती ही बाब सिध्द होवू शकली नाही. अशाप्रकारे अभियोग पक्ष आरोपींविरुध्द पुराव्याची श्रृखंला जोडण्यास अपयशी ठरलेला आहे.

६. वरिल सर्व बाबींचा सारासार विचार करता, अभियोग पक्ष आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) अन्वयेचे आरोप सिध्द करण्यास अपयशी ठरलेला आहे. म्हणुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. जप्त दारु अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क गडचिरोली यांच्याकडे विल्हेवाटी कामी पाठविणे उचित होईल. म्हणुन प्रश्न क्र.१ चे उत्तर ‘नाही’ असे देण्यात येते. सबब, प्रश्न क्र.२ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१ आरोपी किशोर सुखराम सहारे यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) या गुन्हयाच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त दारु अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क गडचिरोली यांच्याकडे विल्हेवाटी कामी पाठविण्यात यावी.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम—४३७(अ) प्रमाणे जामीनाची पुर्तता केली.

५. न्यायनिर्णयाची प्रत जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात यावी.

स्वा/—

(चं.प्र.रघुवंशी)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
गडचिरोली.

स्थळ : गडचिरोली.
दिनांक : २४/०१/२०२४.